नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०२/०२/२०२२ (बुधवार)**

**(सकाळ)**

---

## घरफोडी

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील सिंगोरी शिवार येथे दिनांक ३१/०१/२०२२ चे ०८.०० वा. ते दिनांक ३१/०१/२०२२ चे १८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— दुल्हन राजु तुमसरे वय ४० वर्ष रा. सिंगोरी ता. मौदा जि. नागपुर व त्यांचे घरील सर्व लोक मजुरीच्या कामाकरीता बाहेर गेले असता अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे दाराचे कडी कोंडा तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने सोन्याचे दागीने एकुण कि. ६३,८००/—रू. व नगदी ६,०००/—रु. असा एकुण कि. ६९,८०० /—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार यंगलवार मो.क्र ९४२३२१९४२९ हे करीत आहे.

## गायी चोरी

**पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत ०८ कि.मी. अंतरावरील मौजा ईटगाव शिवार येथे दिनांक ३१/०१/२०२२ चे २०.०० वा. ते दिनांक ०१/०२/२०२२ चे ०४.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. रमा अशोक मानवटकर वय ३६ वर्ष, रा. इटगाव यांच्या गोठयातील तीन गायी एकुण कि. १,००,०००/—रु. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री उबाळे मो. क्र.७४९८१७९१७४ हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. सावनेर**:— दिनांक ३१/०१/२०२२ चे १४.०० वा. ते दिनांक ०१/०२/२०२२ चे ११.०० वा. दरम्यान अल्पवयीन फिर्यादी/पीडित वय १६ वर्षीय ही घरी एकटीच हजर असतांना आरोपी नामे— उमेश बिसेन वय ३० वर्ष, याने सर्वे करण्याच्या बाहाण्याने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. यानंतर आरोपी हा दोन वेळा पीडितेच्या घरी आला होता व तिचे फोनवर देखील मॅसेज केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४(अ),३५४(ड) भादंवी. सहकलम ७, ८, ११ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि रासकर मो.नं ९०८२१९६०८० या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**